महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.०९
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ६४५ दिनांक १३/ ०९/ २०२२

विषय: माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कोणतीही माहिती विचारल्यानंतर जोपर्यंत त्यावर अंतिम न्यायनिर्णय होत नाही तोपर्यंत माहिती सुरक्षित ठेवण्याबाबत.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी नुसार अर्जदारास उपलब्ध असलेली माहिती पुरविणे बंधनकारक असून अधिनियमातील कलम ८ व ९ अंतर्गत कोणत्या परिस्थितीत माहिती नाकारता येते, याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने महावितरण कंपनीमार्फत प्रशासकीय परिपत्रक क्र.२३७ दि.२१.०७.२००९ तसेच परिपत्रक क्र.मासं/रवका/न.क्र.८८७/३६३११ दि.१२.१०.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे.

२. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी तसेच शासनामार्फत निर्गमित करण्यात येणाऱ्या सूचना या म.रा.वि.वि.कं.मर्या.मध्ये वेळोवेळी अंगीकृत केल्या जातात. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागामार्फत शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२१/प्र.क्र.५४/सहा. दि.२५.०८.२०२२ अन्वये माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कोणतीही माहिती विचारल्यानंतर जोपर्यंत त्यावर अंतिम न्यायनिर्णय होत नाही तोपर्यंत माहिती सुरक्षित ठेवणेबाबतच्या सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

३. शासन परिपत्रक दि.२५.०८.२०२२ नुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्जदाराकडून कोणतीही माहिती विचारल्यानंतर जोपर्यंत त्यावर अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत विचारलेली माहिती सुरक्षितपणे कार्यालयात जतन करुन ठेवण्यात यावी.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोवत: शासन परिपत्रक दि.२५.०८.२०२२

(अ.म. मादीकर)
कार्यकारी संचालक (मासं)

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

५) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

७) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कोणतीही माहिती विचारल्यानंतर जो पर्यंत त्यावर अंतिम न्यायनिर्णय होत नाही तोपर्यंत माहिती सुरक्षित ठेवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०२१ /प्र.क्र.५४/ सहा.**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २५ ऑगस्ट, २०२२.

**वाचा:** १. द्वितीय अपील क्र. MHSICMU/ २०१९/ M/००४२०० प्रकरणी राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचे दिनांक ११.०१.२०२१ रोजीचे आदेश.
२. द्वितीय अपील क्र. MHSICMU/ २०१९/ M/००४५५२ प्रकरणी राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचे दिनांक २२.०७.२०२१ रोजीचे आदेश.

**शासन परिपत्रक:-**

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कोणतीही माहिती विचारल्यानंतर जो पर्यंत त्यावर अंतिम न्यायनिर्णय होत नाही तोपर्यंत माहिती सुरक्षित ठेवण्याबाबत परिपत्रक काढण्याचे मा. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी, माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९(८)(क)(चार) अन्वये आदेश दिले आहेत. मा.राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या सदर निर्देशानुषंगाने सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना पुढीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

२. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्जदाराकडून कोणतीही माहिती विचारल्यानंतर जो पर्यंत त्यावर अंतिम न्यायनिर्णय होत नाही तोपर्यंत विचारलेली माहिती सुरक्षितपणे जतन करून ठेवण्यात यावी.

३. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनिक प्राधिकरणे तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करावे.

४ सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०२२०८२५१७०७०८४८०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JANA JIVA VALVI

Digitally signed by JANA JIVA VALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=816d3fe4c7042f66b4ac73a1f0087cd8fda3e115d42dc8b54c0e783064c80dc1, pseudonym=BC7303629AB7AFCA8CE15C55D2BEFE77F3006E6E, serialNumber=FD6F9785FE220B2C0F30D422D401E2DFC838A0D9EC621401534F5B36EAF57F26, cn=JANA JIVA VALVI
Date: 2022.08.25 17:12:20 +05'30'

**( ज. जि. वळवी )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य

६. प्रबंधक, (मूळ शाखा/अपील शाखा), उच्च न्यायालय, मुंबई
७. सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९. प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१०. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१२. महासंचालक, यशदा, पुणे
१३. सर्व विभागीय आयुक्त
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. निवडनस्ती कार्यासन-सहा.